# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांची देखभाल, दुरुस्ती आणि व्यवस्थापन समिती गठीत करणे (१२/०१/२०००) | ७ |
| २. | पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना (१२/७/२०००) | १२ |
| ३. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यामध्ये राबविण्या बाबत (१७/७/२०००) | २० |
| ४. | महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून), व 'अ' वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयाची शीघ्र लेखा तपासणी करण्यासाठी कार्यगटाचे गठण करण्याबाबत. (७/८/२०००) | २७ |
| ५. | ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत ''स्वतंत्र गावांच्या रुपये ७५ लाखा'' पर्यंतच्या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील 'विभाग' जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे व त्यासाठी जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर पदे निर्माण करण्याबाबत. (७/११/२०००) | ३१ |
| ६. | सुधारीत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना. (०३/०९/२००१) | ३८ |
| ७. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात येणारी अनुदाने टप्प्याटप्प्याने कमी करण्याबाबत. (०७/०२/२००३) | ५१ |
| ८. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती पाणीपट्टी वसुली व त्यांच्या जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीमधील वाटपाबाबत. (२२/०५/२००३) | ५४ |
| ९. | विंधण विहीर कार्यक्रमांतर्गत विंधण विहीरीत सुरक्षा प्लेट बसविण्याबाबत (२३/०५/२००३) | ५८ |
| १०. | सुधारीत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना जलस्वराज्य प्रकल्पासाठी सुधारित सूचना. (२२/०८/२००३) | ६४ |
| ११. | मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याबाबत. (१४/१०/२००३) | ७० |
| १२. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम आदिवासी भागासाठी लोकवर्गणी (०५/०१/२००४) | ७८ |
| १३. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत विंधण विहीर घेण्याबाबत. (२०/०१/२००४) | ७९ |
| १४. | मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी जाहिर केलेले ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम प्राथमिक शाळांमध्ये पिण्याचे पाण्याची सोय करण्याबाबत. (२७/०२/२००४) | ८२ |
| १५. | केन्द्र पुरस्कृत 'स्वजलधारा' योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक यंत्रणा, अंमलबजावणी व्यवस्था व निधी वाटपाबाबत (०२/०४/२००४) | ८३ |
| १६. | मा. पंतप्रधानांची स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध र्काक्रमांची अंमलबजावणी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात करण्याबाबत. (२१/०४/२००४) | ९८ |
| १७. | विविध पाणी पुरवठा व स्वच्छता र्काक्रमासाठी सेवाभावी संस्थांची निवड करण्यासाठीचे धोरण (२९/०५/२००४) | १०२ |
| १८. | ग्रामपंचायती/जिल्हा परिषदांनी हस्तांतरीत करून न घेतलेल्या पाणी पुरवठा योजनांवरील देखभाल व दुरुस्तीपोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देय असलेली थकबाकी वसुल करणे. (२९/१०/२००४) | १०९ |
| १९. | मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याबाबत. आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमामधून लोकवर्गणीची रक्कम भरण्यास परवानगी देण्याबाबत. (१८/०१/२००५) | १११ |
| २०. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत किमान १०% लोकसहभाग प्राप्त करून घेण्याची पध्दत घालून देणे व योजनेचे प्राधान्य निश्चित करण्याबाबत. (१८/०१/२००५) | ११३ |

| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २१. | विशेष घटक योजनेअंतर्गत दलित वस्ती कार्यक्रमांमधून हाती घेण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लोकवर्गणी (२४/०१/२००५) | १२१ |
| २२. | मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहिर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात करण्याकरीता अतिरिक्त उद्दिष्ट ठरवून देण्याबाबत. (०३/०२/२००५) | १२३ |
| २३. | पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या विंधण विहिरींवर युपीव्हीसी केसिंग पाईप बसविण्यास परवानगी देण्याबाबत. (०७/०२/२००५) | १२८ |
| २४. | पाणी पुरवठा योजनांतर्गत लोकसहभाग प्राप्त करून घेण्याची पध्दत आखून देण्याबाबत (१८/०२/२००५) | १३० |
| २५. | केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक यंत्रणा, अंमलबजावणी अवस्था व निधी वाटपाबाबत (१४/०३/२००५) | १३९ |
| २६. | ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचा उपाध्यक्ष म्हणून समावेश करणेबाबत. (३१/०३/२००५) | १४१ |
| २७. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम : राज्यांच्या किमान गरजा कार्यक्रमामधून ''महाजल'' योजना राबविण्याबाबत. (३०/०४/२००५) | १४३ |
| २८. | योजनांकरिता स्त्रोत निश्चित करण्यासाठी सक्षम खाजगी सेवा पुरवठादारांच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबत. (२९/०४/२००५) | १४५ |
| २९. | राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीच्या विविध क्षेत्रातील तज्ञांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करणेबाबत. (३०/०४/२००५) | १४७ |
| ३०. | राज्य शासन फुरस्कृत ''महाजल'' व केंद्र शासन पुरस्कृत ''स्वजलधारा'' योजनांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत. (०९/०५/२००५) | १४९ |
| ३१. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करून न घेतल्याने त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने थेट चालविण्याबाबत. (१०/०८/२००५) | १५३ |
| ३२. | जिल्हा परिषदेमधील शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये उपविभागीय अभियंता/उपविभागीय अधिकारी या पदावर निवडीने नेमणूक देण्यासाठी राखून ठेवलेल्या पदांच्या वाट्याचे पुनर्विलोकन. (२८/०९/२००५) | १५८ |
| ३३. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याबाबत (२९/११/२००५) | १५९ |
| ३४. | विंधण विहीर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर ठरवून खाजगी विंदणयंत्रे भाड्याने लावण्याबाबत. (२९/१२/२००५) | १६३ |
| ३५. | नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता देणे. (२४/११/२००६) | १६५ |
| ३६. | भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणीचे धोरण (१८/०३/२००८) | १६७ |
| ३७. | भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची आखणी व अंमलबजावणी संबंधी मार्गदर्शक सूचना (२२/०५/२००८) | १७८ |
| ३८. | जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत करण्याबाबत (२८/०५/२००८) | १८३ |
| ३९. | जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत करण्याबाबत (१८/०६/२००८) | १८५ |
| ४०. | केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम. (१०/०९/२००८) | १८६ |
| ४१. | केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम. (२३/१०/२००८) | १९२ |
| ४२. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना (०१/०८/२००९) | १९७ |

| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४३. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम : देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी ग्राम पंचायती, जिल्हा परिषदा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येणाऱ्या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत. (१७/०८/२००९) | २१५ |
| ४४. | राज्यस्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेची स्थापना करणेबाबत.... (२५/०८/२००९) | २२२ |
| ४५. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी अभियंत्यांच्या सेवा घेण्याबाबत. (०९/०९/२००९) | २२९ |
| ४६. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना (१७/०३/२०१०) | २३८ |
| ४७. | ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी सूरू करण्यात आलेल्या ''जीवन संजीवनी'' योजनेस मुदतवाढ देण्याबाबत. (२३/०३/२०१०) | २५४ |
| ४८. | उद्‌भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासून ३ कि.मी. पेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार आहे, अशा योजनांमधील ३ कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरील पाईप लाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपिंग मशिनरी इत्यादी कामांसाठी येणाऱ्या खर्चावर लोकवर्गणी माफ करण्यासाठी शासन स्तरावर समिती गठित करण्याबाबत. (०१/०७/२०१०) | २५६ |
| ४९. | केंद्र शासन फुरस्कृत जलमणी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.. (०१/१०/२०१०) | २६० |
| ५०. | राज्य स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSSO) स्थापन करण्याबाबत (१७/०१/२०११) | २६४ |
| ५१. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना... (३१/०१/२०११) | २६७ |
| ५२. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची धोरण निश्चित, अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची (State Water & Sanitation Mission) स्थापना... (१०/०२/२०११) | २६९ |
| ५३. | ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये गट संसाधन केंद्रांची (Block Resources Centers) स्थापन करण्याबाबत... (०६/०७/२०११) | २७४ |
| ५४. | केंद्र फुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (DWSM) स्थापन करण्याबाबत... (१५/०७/२०११) | २८१ |
| ५५. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजना नूतनीकरण निधीतून (ARF) घेतलेल्या कामांच्या निधी वितरणाबाबत.... (२१/०९/२०११) | ३०० |
| ५६. | ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्याबाबत. (१८/११/२०११) | ३०२ |
| ५७. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची स्थापना, संरचना, कार्यकक्षा व संनियंत्रणाची कार्यपध्दती विहीत करण्याबाबत (१२/०३/२०१२) | ३०८ |
| ५८. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची स्थापना, संरचना, कार्यकक्षा व संनियंत्रणाची कार्यपध्दती विहीत करण्याबाबत..... (१२/०३/२०१२) | ३२१ |
| ५९. | टंचाईग्रस्त गावांतील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत..... (२७/०३/२०१२) | ३३४ |
| ६०. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजना नूतनीकरण निधीतून (ARF) घ्यावयाच्या कामांबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना. (२०/०४/२०१२) | ३३८ |
| ६१. | निम-शहरी ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांमध्ये (Peri Urban) लगतच्या शहरी निकषांनुसार पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे. (०७/०६/२०१२) | ३४४ |
| ६२. | बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात.... (१६/०७/२०१२) | ३५३ |

| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६३. | जास्त होत असलेल्या किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना लोकवर्गणी माफ करण्याबाबत... (१६/०७/२०१२) | ३५९ |
| ६४. | महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेच्या अंमलबजावणी कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेबाबत... (१४/०८/२०१२) | ३६० |
| ६५. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्रचलित दरडोई खर्चाचे निकष ३० ते ५० टक्केपर्यंत शिथिल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना देणेबाबत... (१३/०८/२०१२) | ३६२ |
| ६६. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारावयाच्या लोकवर्गणीबाबत.... (०३/१०/२०१२) | ३६३ |
| ६७. | निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याबाह्य ग्रामपंचायती/गावातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत... (०४/१०/२०१२) | ३६६ |
| ६८. | टंचाईग्रस्त गावांतील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत... (०७/१२/२०१२) | ३६८ |
| ६९. | टंचाईग्रस्त गावांतील स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा जून, २०१३ पर्यंत खंडीत न होण्याबद्दल उपाययोजना करण्याबाबत..... (०७/०१/२०१३) | ३७० |
| ७०. | निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत..... (१५/०१/२०१३) | ३७३ |
| ७१. | टंचाईग्रस्त गावांतील नियमित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्याबाबत..... (२५/०३/२०१३) | ३७५ |
| ७२. | ग्रामीण स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत. (१६/०७/२०१३) | ३८४ |
| ७३. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करण्याबाबत. (०९/१०/२०१३) | ३८८ |
| ७४. | जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या तथापि अपुर्ण अवस्थेत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची उर्वरित कामे पूर्ण करण्याबाबत... (१०/१२/२०१३) | ३९२ |
| ७५. | राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकवर्गणीचे सुधारित धोरण. (०१/०१/२०१४) | ४०६ |
| ७६. | जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात राववावयाच्या जलस्वराज्य-२ कार्यक्रम अंमलबजावणीबाबत. (०४/०१/२०१४) | ४१० |
| ७७. | राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीचे सुधारित धोरण (२२/०१/२०१४) | ४२२ |
| ७८. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमण्यात येणाऱ्या कंत्राटी अभियंत्यांच्या मानधनामध्ये वाढ करणे त्याचप्रमाणे त्यांच्या सेवाशर्ती निश्चित करणे. (०४/०६/२०१४) | ४२६ |
| ७९. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व देखभाल दुरुस्तीबाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना. (०९/०७/२०१४) | ४३६ |
| ८०. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या सुधारित निकषाच्या १०० टक्केहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना मान्यता देण्यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याबाबत (०१/०८/२०१४) | ४४३ |
| ८१. | शहरालगतच्या ग्रामपंचायती, वाड्या वस्त्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना (११/०९/२०१४) | ४४६ |
| ८२. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना (१७/१०/२०१४) | ४५२ |
| ८३. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम : साध्या विहिरींच्या कामासाठी निधी वितरणाची पध्दत लागू करणेबाबत. (२८/११/२०१४) | ४६० |
| ८४. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीच्या अधिकारांबाबत. (१६/०२/२०१५) | ४६३ |
| ८५. | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा परिषदा आणि ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या निधीबाबत सुधारित निर्देश (२०/०२/२०१५) | ४६६ |
| ८६. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद व कार्यालयीन अधिक्षक, जलस्वराज्य या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्याबाबत. (०२/०३/२०१५) | ४७१ |

| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ८७. | जिल्हा परिषद, पालघर करिता जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (DWSM) कक्ष स्थापन करण्याबाबत.... (०३/०३/२०१५) | ४७९ |
| ८८. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना (१०/०३/२०१५) | ४९९ |
| ८९. | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसुती रजेबाबत. (२०/०३/२०१५) | ५०२ |
| ९०. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करण्याबाबत. (२७/०३/२०१५) | ५०५ |
| ९१. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना. (१५/०६/२०१५) | ५०८ |
| ९२. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय भारत निर्माण कक्षाचे प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात विलीनीकरण करणेबाबत. (१४/०७/२०१५) | ५१६ |
| ९३. | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदा आणि ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांमार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रशासकीय खर्चाबाबत. (२६/०२/२०१६) | ५२१ |
| ९४. | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) राज्यभरात राबविणेबाबत. (७/०५/२०१६) | ५२३ |
| ९५. | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (MRDWP) अंमलबजावणीबाबत. (२५/०१/२०१७) | ६२३ |
| ९६. | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसुती रजेबाबत. (२८/०२/२०१७) | ६२८ |
| ९७. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत स्थापित केलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अंमलबजावणीच्या अधिकारात सुधारणा करण्याबाबत. (०९/०३/२०१८) | ६३० |
| ९८. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या पाणी आरक्षणाबाबत. (०८/०८/२०१८) | ६३४ |
| ९९. | राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता चाचणी विंधण विहिरी घेण्याबाबत. (१५/११/२०१८) | ६३६ |
| १००. | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांना वितरीत करावयाच्या देखभाल-दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाबाबत मार्गदर्शक सूचना. (२६/११/२०१८) | ६३८ |
| १०१. | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट नळ पाणीपुरवठा योजनांकरिता सौर ऊर्जा पध्दतीचा वापर करणेबाबत. (२७/१२/२०१८) | ६४१ |
| १०२. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार स्थापित राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समित्यांची पुनर्रचना. (०१/०१/२०१९) | ६४४ |
| १०३. | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत. (१०/०१/२०१९) | ६४७ |
| १०४. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकारात सुधारणा करण्याबाबत. (११/०२/२०१९) | ६५० |
| १०५. | ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना-तीनही टप्प्यांचे कार्यारंभ आदेश एकाच वेळी देण्याबाबत. (१९/०७/२०१९) | ६५६ |
| १०६. | ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत. (२१/०८/२०१९) | ६६१ |
| १०७. | जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) संदर्भात मार्गदर्शक सूचना. (३०/०६/२०२०) | ६६४ |
| १०८. | राज्यात जल जीवन मिशन राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना. (०४/०९/२०२०) | ६६८ |
| १०९. | केंद्र शासनाने बंधित केलेल्या पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीमधून पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक योजना राबविण्याविषयी तांत्रिक मार्गदर्शक सूचना. (१९/११/२०२०) | ६८६ |

| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ११०. | जल जीवन मिशन अंतर्गत १०० दिवसांचे विशेष अभियान सर्व ग्रामीण शाळांना शुध्द पेयजल उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यपध्दती (१३/०१/२०२१) | ६९४ |
| १११. | राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरिता मार्गदर्शक सूचना - जिल्हास्तरीय समित्यांची रचना. (११/०२/२०२१) | ७०१ |
| ११२. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कंत्राटांमधील वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीबाबत. (१५/०२/२०२१) | ७०४ |
| ११३. | जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/प्रशासकीय/अंमलबजावणी अधिकारांबाबत. (१०/०३/२०२१) | ७१३ |
| ११४. | जल जीवन मिशन अंतर्गत शाश्वत कार्यात्मक नळ जोडणी देण्यासाठी पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत कॅच द रेन (Catch the Rain) तत्वावर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता राजयभरात ''स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना'' राबविण्याबाबत... (२०/०५/२०२१) | ७२० |
| ११५. | राज्याच्या पर्यटन धोरणानुसार केंद्र शासनाकडील पर्यटन मंत्रालयाकडे अथवा पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या घटकांसाठी पाणीपट्टी आकारणीबाबत. (२३/०६/२०२१) | ७४३ |
| ११६. | जल जीवन मिशन अंतर्गत शाश्वत कार्यात्मक नळ जोडणी देण्यासाठी पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत कॅच द रेन (Catch the Rain) तत्वावर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात ''स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना'' राबविण्याबाबत... (२०/०८/२०२१) | ७४७ |
| ११७. | जल जीवन मिशन अंतर्गत योजना अंमलबजावणी स्थळी प्रदर्शनी फलक लावणेबाबत. (२६/०८/२०२१) | ७५७ |
| ११८. | जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/प्रशासकीय/अंमलबजावणी अधिकाराबाबत. (२२/०९/२०२१) | ७६१ |
| ११९. | जल जीवन मिशन अंतर्गत घरगुती नळ जोडण्याच्या कार्यात्मकतेबाबत (Functionality) (२०/१०/२०२१) | ७६५ |
| १२०. | जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत फ्लेक्झी फंड मंजुरीकरीता राज्यस्तरीय समितीचे गठण. (२४/११/२०२१) | ७६७ |
| १२१. | जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्वीकृतीसाठी कार्यपध्दती (०८/१२/२०२१) | ७७० |
| १२२. | जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत. (०८/१२/२०२१) | ७७३ |
| १२३. | जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत. (१४/१२/२०२१) | ७७५ |
| १२४. | जल जीवन मिशन अंतर्गत प्रादेशिक विभाग स्तरावरील तांत्रीक छाननी समितीबाबत. (१९/०१/२०२२) | ७७७ |
| १२५. | जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/प्रशासकीय/अंमलबजावणी अधिकारांमध्ये सुधारणा करणेबाबत. (२५/०२/२०२२) | ७८० |

ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांची
देखभाल, दुरुस्ती आणि व्यवस्थापन—
समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र. ३४८/पापु-०७
दिनांक :-.१२ जानेवारी, २०००.

<u>प्रस्तावना</u>

दिनांक ०१.१२.१९९९ रोजी राज्य मंत्रिमंडळाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्या आढाव्यात ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा तसेच ग्रामीण व नागरी स्वच्छताविषयक धोरणे आणि राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमांवर चर्चा झाली. ग्रामीण व नागरी भागात लोकांना पाणी पुरवठ्याची सेवा योग्य प्रकारे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कार्यान्वित करण्यात आलेल्या योजना व निर्माण करण्यात आलेली मालमत्ता यांची देखभाल व दुरुस्ती कशा प्रकारे होत आहे, याकरीता काय व्यवस्था अस्तित्वात आहे आणि अशी व्यवस्था आणखी परिणामकारक कशा प्रकारे करता येईल इत्यादी मुद्यांवर विशेष चर्चा झाली.

२. राज्यातील ग्रामीण व नागरी भागात आतापर्यंत राबविण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना आणि त्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीची सध्या अस्तित्वात असलेली व्यवस्था अनेक अर्थाने अपुरी आहे. परिणामतः पूर्ण करण्यात आलेल्या योजना स्थानिक संस्था ताब्यात घेत नाहीत आणि त्या चालविण्यास असमर्थता व्यक्त करतात. नाईलाजाने अशा योजना कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणांमार्फतच वर्षानुवर्षे चालवाव्या लागतात. सध्या ग्रामीण व नागरी भागातील सुमारे ३०० पाणी पुरवठा योजना संबंधित ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांनी चालविण्यासाठी ताब्यात घेतलेल्या नाहीत म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडेच चालविण्यासाठी आहेत. या कारणामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नवीन योजना कार्यन्वित करण्यासाठी जो निधी देण्यात येतो त्यापैकीच काही निधी अशा योजना चालविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास खर्च करावा लागतो. आतापर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अशा प्रकारे ज्या योजना चालविल्या आहेत त्याबद्दलची तसेच नागरी संस्थांच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारलेल्या कर्जाची परतफेड संबंधित संस्थांनी न केल्यामुळे मोठी थकबाकी स्थानिक संस्थांकडे आहे. (अंदाजे रु.६५० कोटी)

३. देखभाल व दुरुस्ती करिता संबंधित जिल्हा परिषदा, ग्राम पंचायती, नगरपालिका व महानगरपालिकांनी यापूर्वी कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणांकडून ज्या योजना घेतल्या आहेत त्यांचीही देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होत नाही असा सर्वसाधारणपणे अनुभव आहे. अशा योजना योग्य प्रकारे चालविण्यासाठी आवश्यक त्या दराने वसूली पुरेशा प्रमाणात होत नाही. स्थानिक संस्थांकडे अशा प्रकारे योजनांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता आवश्यक त्या प्रमाणात निधी जमा होत नाही. स्थानिक संस्थांकडे आवश्यक ते प्रशिक्षित व कुशल कर्मचारी पण उपलब्ध नाहीत म्हणून देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे केली जात नाही.

४. पाणी पुरवठा सेवेच्या दृष्टीने एकंदरीत विचार करता आतापर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना व निर्माण करण्यात आलेल्या मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीची पुरेशी आणि परिणामकारक अशी व्यवस्था अजूनही अस्तित्वात येऊ शकली नाही. मात्र पाणी पुरवठ्याची सेवा अत्यावश्यक असल्याने ती दीर्घकाळ टिकेल यादृष्टीने योजनेची व मालमत्तेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती होत रहाणे आवश्यक आहे आणि त्याकरिता परिणामकारक व्यवस्था निर्माण करणे जरुरी आहे.

५. या विषयावर यापूर्वी ग्राम विकास विभागामार्फत २ समित्या नेमण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक समिती दिनांक २६.९.१९८९ च्या आदेशान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम - नळ योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन याबाबत विचार करण्यासाठी त्यावेळचे आयुक्त, औरंगाबाद विभाग, श्री बि.ना.मखीजा यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली होती. या समितीने जुलै, १९९० मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला होता. दुसरी समिती ग्रामीण व नागरी भागात पाणी पुरवठ्याबाबत आराखडा तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेली मंत्रिमंडळ उप समिती होती. ही मंत्रिमंडळ उप समिती दिनांक २५ जून, १९९२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित करण्यात आली होती. या मंत्रिमंडळ उप समितीने जानेवारी, १९९४ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला होता.

६. वरील दोन समित्यांनी केलेल्या शिफारशींपैकी बहुतांशी शिफारशी राज्य शासनाने मान्य केल्या व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. तरीपण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीची समाधानकारक अशी व्यवस्था अजूनही निर्माण होऊ शकली नाही.

## शासन निर्णय :-

वरील परिस्थिती लक्षात घेता शासनाने या विषयाचा पुन्हा एकदा सखोल अभ्यास करुन कार्यदिशा सुचविण्याकरीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

या समितीची रचना, कार्यकक्षा इत्यादी खालीलप्रमाणे राहील.

<u>समितीची रचना</u> :-

| | | |
|---|---|---|
| १. श्री.द.म.सुकथनकर | माजी मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. श्री. वेंकटचारी | सदस्य, महाराष्ट्र इलेक्ट्रिसीटी रेग्युलेटरी कमिशन, मुंबई. | सदस्य |
| ३. श्री.बी.व्ही.रोटकर | माजी सदस्य सचिव,महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ (आताचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण), मुंबई. | सदस्य |
| ४. श्री.नासेर मुंजी | डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फायनान्स कं. लि., मुंबई. | सदस्य |
| ५. श्री.व्ही.पी.राजा | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :-**

(१) राज्यातील ग्रामीण व नागरी भागात अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजना व मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीची जी प्रचलित व्यवस्था आहे, तिचा सखोल अभ्यास करणे. यात स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा व नागरी पाणी पुरवठा योजना यांचा समावेश राहील.

(२) राज्य शासनाचे १९९६ पासून पाणी पुरवठा सेवे संदर्भात असलेले बृहत आराखडे राबविण्याचे धोरण तसेच बृहत् आराखडे आणि टँकरमुक्ती कार्यक्रम राबविण्याच्या संदर्भात ज्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्या आहेत, होत आहेत आणि प्रस्तावित आहेत त्यातून तयार होणारी पाणी पुरवठा व्यवस्था आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारी मालमत्ता यांचा विचार करुन भविष्यकाळात त्यांच्या देखभाल व दुरुस्तीची गरज, व निर्माण होणारे स्वरुप यांची मांडणी करणे.

(३) वरील (१) व (२) विचारात घेऊन ग्रामीण आणि नागरी भागातील पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीची दीर्घकाल टिकू शकेल अशी यथायोग्य व्यवस्था सुचविणे. यात संस्थात्मक, आर्थिक आणि व्यवस्थापकीय कौशल्य यासंबंधी सर्व बाबींचा समावेश असावा.

संस्थात्मक बाबींमध्ये स्थानिक संस्थांचे बळकटीकरण, आर्थिक बाबींच्या संदर्भात पाणीपट्टीचे दर निश्चित करण्याची पध्दत, पाणीपट्टी वसुलीची व्यवस्था, इत्यादी देखभाल व दुरुस्ती आणि व्यवस्थापन कौशल्याच्या दृष्टीने आवश्यक ते तंत्रज्ञान, मनुष्यबळ, कार्यपध्दती इत्यादींचा समितीने विचार करावा.

(४) पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती खाजगी करणाच्या माध्यमातून करण्याकरिता समितीने आवश्यक त्या सर्व पैलूंवर विचार करुन ही प्रक्रिया कश्याप्रकारे अंमलात आणता येईल याची आखणी व कार्यपध्दत सुचवावी.

(५) सध्या महाराष्ट्र राज्यात स्थानिक संस्था व्यतिरिक्त पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे आणि त्या चालविणे याकरिता आवश्यक असलेले मनुष्यबळ, तंत्रज्ञान कौशल्ये असलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही एकमेव संस्था आहे.पाणी पुरवठ्याच्या या कामामध्ये वाजवी स्पर्धेचे वातावरण निर्माण करता यावे, जेणेकरुन खाजगी क्षेत्रातील इतर संस्थांनाही स्पर्धेमध्ये भाग घेता यावे याकरिता समितीने एक कृती योजना सुचवावी.

(६) पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती स्वयंनिर्भर करता यावी याकरिता आवश्यक पाणीपट्टी वसूल करणे, पाणीपट्टी निर्धारित करणे इ.बाबींमध्ये स्थानिक संस्थांनी पुढाकार न घेण्याची व शिस्त न पाळण्याची जी प्रवृत्ती दिसून येते त्यावरही उपाय योजना करणे आवश्यक आहे. शिवाय या कार्याच्या खाजगीकरणाची प्रक्रिया वाढीला लागावी याकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता सेवेचे योग्य मूल्य निर्धारण करणे, पाणीपट्टीचे यथायोग्य दर लागू करणे, स्थानिक संस्था आणि खाजगी क्षेत्रातील व्यवसायीके यांच्यामधील संभाव्य वादांचा निपटारा करणे इ.आवश्यक राहील. यासंबंधी सर्व मुद्दे आणि पैलू यांचा सखोल अभ्यास करुन समितीने स्वतंत्र नियामक प्राधिकरणाची स्थापना करण्याबद्दल आपल्या शिफारशी शासनास सादर कराव्यात.

(७) भूजलाच्या उपसावर प्रभावी नियंत्रण आणता यावे याकरिता महाराष्ट्र भूजल कायदा १९९३, व नियम १९९५ यांच्या प्रभावी अंमलबजावणी करीता आवश्यक उपाययोजना, भूजल व्यवस्थापनाची पध्दत, त्या कायदा व नियमातील आवश्यक त्या दुरुस्त्या इत्यादी सुचविणे.

(८) • आपल्या कार्याच्या दृष्टीने राज्य शासकीय विभाग व स्थानिक संस्थांच्या कार्यालयाकडून आवश्यक ती माहिती व सहाय्य घेण्याची तसेच आपल्या शिफारशीकरिता समितीला आवश्यक वाटतील अशा इतर बाबींचाही विचार करण्याची समितीला मुभा राहील.

कालावधी :-

या समितीने आपला अहवाल व शिफारशी समिती स्थापन झाल्यानंतर समितीच्या प्रथम बैठकीच्या दिनांकापासून ६ महिन्यात शासनास सादर कराव्यात.

मानधन इ. :-

या समितीचे अध्यक्ष व सदस्य (शासकीय सेवेत असलेले अधिकारी वगळून) यांचे सार्वजनिक जीवनात असलेले प्रतिष्ठेचे स्थान, अनुभव व विशेष कौशल्य लक्षात घेता त्यांना या कामाचा मोबदला म्हणून एक रकमी मानधन देण्यात येईल. समितीच्या अध्यक्षांना हे मानधन रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) व प्रत्येक अशासकीय

सदस्यास रु.७०,०००/- (रुपये सत्तर हजार फक्त) याप्रमाणे देण्यात येईल. यापैकी १/३ भाग समितीने आपल्या कामाची रुपरेषा तयार करुन सादर केल्यावर अदा केला जाईल व उरलेला २/३ भाग अहवाल व शिफारशी सादर केल्यावर अदा करण्यात येईल. त्यांच्या सेवेचा मोबदला अदा करण्याची ही पध्दत अवलंबल्याने त्यांना प्रवासभत्ता, दैनिक भत्ता इत्यादी देय असणार नाही.

याबाबतचा खर्च ' ३४५१ सेक्रेटरिएट आर्थिक सेवा, ०९० सेक्रेटरिएट-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ०५ कार्यालयीन खर्च(३४५१०४६७) या लेखाशीर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०६२/व्यय-३, दिनांक २१.१२.१९९९ च्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

व्ही पी राजा
(व्ही.पी.राजा) १२/१/2000
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव मुंबई.
श्री.द.म.सुकथनकर माजी मुख्य सचिव मुंबई.
श्री. वेंकटचारी, सदस्य, महाराष्ट्र इलेक्ट्रिसीटी रेग्युलेटरी कमिशन, मुंबई.
श्री.बी.व्ही.शेटकर, माजी सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ मुंबई.
श्री.नासेर मुंजी, डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फायनान्स कं.लि., मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, लेखापरिक्षा, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखापरिक्षा, नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर.
सर्व मंत्रालयीन विभागाचे [illegible] मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हयांचे जिल्हाधि[illegible]
सर्व जिल्हा परिषदांचे मु[illegible]कारी अधिकारी.
सदस्य सचिव (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
सदस्य सचिव (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे-३७.
सर्व विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा

सांकेतांक क्रमांक २००८०५१४१५५०४१००१

**पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.८१ /पापु०७**
**मंत्रालय,मुंबई ४०००३२,दि. १२ जुलै,२०००.**

**वाचा :** १)शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.ग्रापापु १०९३/प्र.क्र.७११/३९-अ, दिनांक.१मार्च,१९९४.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२८०/पापु ०७, दिनांक.२८.११.१९९६.
३) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२९०/पापु ०७, दिनांक.१९.३.१९९७ व २६.६.१९९७.
४) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२९०/पापु ०७, दिनांक.२.६.१९९८.
५) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.२९२/पापु ०७, दिनांक. १४ जुन, १९९९.
६)शासन परिपत्रक , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु २०००/प्र.क्र.४०/पापु ०७, दिनांक.२६एप्रिल,२०००.

**परिपत्रक :**

राज्यामधील ग्रामीण भागात पिण्याचे शुध्द व सुरक्षित पाणी उपलब्ध न झाल्यामुळे अतीसार, गॅस्ट्रो, काविळ, विषमज्वर या सारख्या जलजन्य व संसर्गजन्य रोगांना वेळोवेळी तोंड दयावे लागते. अनेकदा अशा रोगांचे प्रत्यावरोपण साथीच्या स्वरूपात होते.राज्यातील काही भागात शुध्द पिण्याच्या पाण्याची टंचाई उन्हाळयात कमी जास्त प्रमाणात जाणवू लागते. त्याच प्रमाणे पावसाळयामध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत/ साठे दुषित/अशुध्द झाल्यामुळे शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धताकमी होते.अशा प्रकारे ऋतूमानानुसार जलजन्य व संसर्गजन्य रोगांच्या साथी होण्याची ही दोन मुख्य कारणे आहेत.

२. या बाबींना आळा बसावा या करीता योग्य त्या उपाय योजना करण्यासाठी संदर्भात नमूद केलेल्या परिपत्रकान्वये आणि शासन निर्णयान्वये पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी वापरावयाची टी.सी.एल.पावडर हाताळताना घ्यावयाची दक्षता व करावयाच्या कार्यवाही संदर्भात तसेच पाणी शुध्दीकरण व साथरोग नियंत्रणाच्या संदर्भात विस्तृत सूचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. तथापी अद्यापही राज्यातील काही भागांमध्ये साथीच्या रोगांचा उद्रेक झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. वरील परिच्छेदात विशद केलेली पार्श्वभूमी विचारात घेऊन, पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना क्षेत्रीय यंत्रणेकडून वेळीच घेतल्या न गेल्यास पावसाळयात साथीच्या रोगास नागरिकांना सामोरे जावे

लागण्याची शक्यता असते म्हणून पावसाळा सुरु होताना पाणी उद्भव कसे स्वच्छ ठेवावेत व टी.सी.एल.पावडर हाताळताना कोणती दक्षता घ्यावी याबाबत पुनरुच्चार करुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना पुन्हा सर्व संबंधितांच्या माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येत आहेत.

१. पिण्याचे पाणी ज्या स्त्रोतामधून पुरविण्यात येते त्या स्त्रोतांचे शुध्दीकरण दररोज करण्यात यावे.

२. पिण्याच्या पाण्याची दररोज ओ.टी. टेस्ट ग्राम पाणी पुरवठा कर्मचाऱ्याने केली पाहिजे व त्याची नोंद त्याने नोंद वहीत ठेवावी.

३. ओ.टी. टेस्ट निगेटिव्ह आल्यास त्याने लगेच पाण्यात टि.सी.एल. टाकून पाण्याचे निर्जंतूकीकरण करावे. व त्यानंतर एक तासाने पाणी सोडावे.

४. पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी पुरेशा प्रमाणात क्लोरीनच्या गोळया, टी.सी.एल.पावडर अथवा तत्सम औषधी द्रव्ये नियमित वापरण्यात यावीत व ती सर्व संबंधितांना वेळोवेळी पुरविण्याची खबरदारी घेण्यात यावी.

५. टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्यास टँकरमुळे पाणी प्रदूषित होत नाही याची खात्री करुन घ्यावी. तसेच टँकरमध्ये पाणी भरल्यानंतर पाण्यात क्लोरीन गोळया, टी.सी.एल.पावडर अथवा तत्सम औषधी द्रव्ये टाकण्यात यावीत.

६. पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या टी.सी.एल पावडर अथवा तत्सम औषधी द्रव्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असेल याची खात्री करुन घेण्यात यावी.

७. पिण्याच्या पाण्याचे नमुने त्याचबरोबर ब्लिचिंग पावडरचे नमुने जमा करुन त्यांची प्रयोगशाळेत नियमितपणे तपासणी करुन घेण्यात यावी व नमुने प्रदुषित आढळून आल्यास त्यावर बारकाईने लक्ष ठेवून पाणी शुध्दीकरण कटाक्षाने करण्यात येते याची व्यक्तीशः खात्री करुन घ्यावी.

८. पाणी पुरवठयाच्या नादुरुस्त जलवाहीन्यांची आवश्यक दुरुस्ती करुन पाण्याची गळती थांबविण्यात यावी.

९. विस्कळीत झालेल्या पाणी पुरवठा योजनेची दुरुस्ती ही तातडीने होण्यासाठी अशा क्षेत्रातील योजनेच्या देखभाल व दुरुस्तीला प्राधान्य देऊन ती दुरुस्त करण्यात यावी.

१०. तीन महिन्यांपेक्षा जास्त साठवलेली टी.सी.एल.पावडर तपासणी करुन दर्जा योग्य आहे असे कळल्यानंतरच वापरावी.

११. टी.सी.एल.पावडर बंद डब्यात ठेवावी. ती कधीही उघडे राहणार नाही. याची काळजी घ्यावी.

१२. टी.सी.एल.पावडर कोरडया जागी साठवावी, ओलसर जागी ठेवू नये.

१३. टी.सी.एल.पावडर. च्या साठयावर सूर्यप्रकाश पडणार नाही याची काळजी घ्यावी. ती कोरडया खोलीत साठवावी.

१४.पाणी निर्जंतूक करण्यासाठी टी.सी.एल.पावडर घेवून जातांना सुध्दा ती बंद असावी व त्यावर सूर्यप्रकाश पडणार नाही याची काळजी घ्यावी.

१५.पिण्याचे पाणी उकळून व गाळून घेण्याबाबत सर्व नागरिकांना विनंती करण्यात यावी.

१६. असुरक्षित पाणी घेऊ नये असे नागरिकांना सांगावे.

४. तसेच ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी टि.सी.एल. पावडरची साठवण योग्य रितीने केली जाते का ? ओ.टी. टेस्ट रोज केली जाते का ? त्याच्या नोंदी ठेवल्या जातात का ? याबाबत नियमितपणे तपासणी करावी. त्याप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही यासंबंधीचा आढावा घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व संबंधित गट विकास अधिकारी यांनी वेळोवेळी वेगवेगळया गावांना भेटी द्याव्यात व त्यांचे संनियंत्रण करावे.

५. वरील प्रमाणे सर्व सूचनांचे तसेच संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात तसेच पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणाबाबत संबंधित यंत्रणांनी दक्ष राहून पिण्याचे पाणी उकळून व गाळून घेण्याबाबत तसेच यासाठी दक्षता घेताना नागरीकांनी "कोणत्या बाबी कराव्यात" वा "कोणत्या बाबी करू नयेत" याबाबत सविस्तर सूचना तयार करून त्याची विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी करण्यात यावी.ज्यामुळे जलजन्य रोगास आळा बसू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( सुधाकर ग्रा. बोबडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सदस्यसचिव (प्रशासन),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई.
सदस्यसचिव (तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पूणे.
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.

सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ.
सार्वजनिक आरोग्य विभाग.
ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु १०९९/प्र.क्र. ३२८ / पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २७ जुलै,२०००**

**प्रस्तावना :**

पिण्याचे पाणी पुरविण्याच्या दृष्टीने कठीण असलेल्या गावांची संख्या मोठी असल्याने, या गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यास गती यावी या उद्देशाने केंद्र शासनाने सन १९७२-७३ पासून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम सुरु केला. हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येत असून त्या करीता केंद्र शासन अनुदान देते. तसेच राज्य शासनामार्फत किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यात येतो. वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून मिळणा-या अनुदानाएवढी तरतूद राज्य शासनास किमान गरजा कार्यक्रमाखाली करावी लागते.

२. सदर कार्यक्रम अंमलबजावणीबाबत केंद्र शासनास आलेला अनुभव, त्या आधारे केलेले मुल्यमापन आणि इतर अभ्यासाअंती ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बद्दल केंद्र शासन काही विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहचले आणि त्याआधारे केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी एप्रिल १९९९ मध्ये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्या सन १९९९-२००० पासून लागू केल्या आहेत.

३. केंद्र शासनाच्या निष्कर्षांचा अभ्यास करुन आणि राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेता, राज्य शासनासही राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आणि राज्यातील ग्रामीण जनतेला पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याकरिता सध्याच्या धोरणात अमुलाग्र बदल करणे/स्वीकारणे आवश्यक आहे याची खात्री पटली. विशेषत: पिण्याच्या पाण्याची गरज असणा-या स्थानिक जनतेचा पाणी पुरवठा योजनेच्या निर्मितीपासून ते देखभाल व दुरुस्ती पर्यंतच्या नियोजनात, अंमलबजावणीत व निर्णय प्रक्रियेत सक्रीय आर्थिक व व्यवस्थापकीय पुढाकार अणि सहभाग असल्याशिवाय हा कार्यक्रम दीर्घकालीन स्वरुपात यशस्वी होऊ शकणार नाही आणि तो लोकाभिमुख होणार नाही असे शासनाचे मत आहे.

४.	लाभधारक ग्रामस्थांना उपलब्ध विविध पर्यायांची माहिती देऊन त्या पर्यायांपैकी त्यांना योग्य वाटेल व परवडेल अशा पर्यायाची निवड करण्याची त्यांना पूर्ण मुभा देवून, त्यांना नियोजन, अंमलबजावणी व व्यवस्थापन प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याचा शासनाने निर्णय घेतल्याशिवाय पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी आतापर्यंत राज्याला आर्थिक मदत देणा-या जागतिक बँकासारख्या बाहय अर्थसहाय्य करणा-या संस्थांनीही मदत करण्यास असमर्थता दर्शविली आहे.

५.	वरिल पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी ही " सामाजिक -आर्थिक " साधनसामुग्री समजून ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याची त्यांची मागणी समूह कृतीतून, प्राप्त करुन घेण्याच्या भूमिकेला धोरणात्मक स्वरुप देण्यासाठी केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लागू केलेल्या सुधारित मार्गदर्शक सुचनां राज्यामध्ये केंद्र शासनाच्या वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी व राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी व आवश्यकतेनुसार बाहय मदतीच्या योजनांसाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी व या संदर्भातील सर्व बाबींचा विचार करुन **केंद्र शासनाचा वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम आणि राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये या पुढे केंद्र शासनाने एप्रिल १९९९ मध्ये निर्गमित केलेल्या पुढील सुधारित मार्गदर्शक सुचनानुसार राबविण्यास शासन मंजूरी देत आहे.**

**१) दरडोई पाणी पुरवठयाचे प्रमाण** :- वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व राज्यशासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी दरडोई दर दिवशी **४० लिटर** प्रति माणशी हे पाणी पुरवठयाचे प्रमाण विचारात घेऊन योजनांची आखणी करण्यात यावी. यामध्ये केवळ पिण्यासाठी ३ लिटर, तर इतर बाबींसाठी म्हणजे स्वयंपाकासाठी ५ लिटर, आंघोळीसाठी १५ लिटर, भांडी धुण्यासाठी ७ लिटर व स्वच्छतेसाठी १० लिटर पाण्याचा समावेश आहे.

**२) गावे/वाडया निवडीचे निकष** :- वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व राज्यशासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी गावांची /वाडयांची निवड खालील निकषानुसार करण्यात यावी.

**अ)** सपाट प्रदेशात १.६ कि.मी अंतरावर व डोंगराळ प्रदेशात १०० मीटर उंच अंतरापर्यंत पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक अथवा खाजगी उद्‌भव नसलेली गावे /वाडया.

**ब)** जेथे पाण्याचे उद्‌भव उपलब्ध आहेत परंतु तेथील पाण्याची गुणवत्ता अयोग्य आहे. अशी गावे /वाडया उदा. अतिक्षार, लोह, फ्लोराईड, आर्सेनिक किंवा इतर विषारी पदार्थाचे अतिरिक्त प्रमाण आणि जैविकदृष्टया दूषित.

**क)** जेथे पाणी पुरवठा उपलब्ध आहे, परंतु विहित निकषापेक्षा कमी आहे अशी गावे/वाडया ( ४० लिटर दरडोई दरमाणशी पेक्षा कमी.)

**३) गावे/वाडया हाताळण्यासाठी प्राथम्यक्रम:-** वर्धित वेग ग्रामीण पुरवठा कार्यक्रम व राज्यशासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत गावे/वाडया खालील प्राथम्य क्रमानुसार हाताळण्यात यावीत.

**अ)** ज्या गांवा/वाडयांमध्ये निव्वळ अनुसूचित जाती जमातीची वस्ती आहे किंवा १९९४ चा स्थितीदर्शक अहवाल (सर्वेक्षण ) आणि १९९६-९७ मधील पुनःसर्वेक्षणानुसार जेथे अनुसूचित जाती/जमातीची लोकसंख्या जास्त आहे अशा गावे/वाडयांना प्राधान्य.

**ब)** प्रथम तीव्र विषारीपणामुळे पाण्याची गुणवत्ता बाधीत झालेली गावे /वाडया, आणि त्यानंतर इतर गावे /वाडया.

**क)** ४० लिटर माणशी प्रती दिन पेक्षा कमी पाणी उपलब्ध होणा-या गावे /वाडयांची पातळी उंचावून ती ४० लिटर प्रती माणशी प्रति दिन या प्रमाणे करणे.

**ड)** ग्रामीण भागातील ज्या शाळा/अंगणवाडया इत्यादींना पाणी पुरवठा होत नाही त्या शाळा व अंगणवाडया.

**४) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमात लोकसहभाग: -**

**अ)** पाणी पुरवठा योजने मार्फत होणारा पाणी पुरवठा शुध्द, खात्रीशीर व सातत्याने मिळत असेल आणि तो व्यवस्थितरित्या चालू ठेवण्याची व्यवस्था होत असेल तर गरीबांतील गरीब सुध्दा अशा योजनांच्या भांडवली खर्चाचा काही भाग उचलण्यास तयार असतात असे विविध सर्वेक्षणामध्ये आढळून आले आहे. तसेच योजनेमध्ये लोकांचा सहभाग असल्याशिवाय त्यांच्या मनांमध्ये त्या योजनेबद्दल स्वमालकीची व आपलेपणाची जाणीव निर्माण होत नाही. म्हणून या पुढे योजनांची आखणी व अंमलबजावणी करताना स्थानिक लोकांना विश्वासात घेवून त्यांना परवडेल व मान्य असेल अशी तांत्रिक व व्यवस्थापकीय दृष्टया योग्य योजना आखून त्या **योजनेच्या भांडवली खर्चाचा १०% भाग लाभार्थ्यांकडून लोकवर्गणी द्वारे वसूल करण्यात यावा. तसेच योजनांच्या देखभाल व दुरुस्तीचा १००% खर्च लाभार्थ्यांनी उचलावा.**

**ब)** वरिल परिच्छेद २ मधील अ) ते क) मधील निकषात बसणारी गावे/वाडया करीता योजनेची आखणी करताना त्या गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या योजनेसाठी असलेले विविध पर्याय, त्या सर्व पर्यायी योजनांचा अंदाजित भांडवली खर्च, देखभाल दुरुस्ती वरील वार्षिक खर्च व संभाव्य पाणीपट्टी या बाबतची संपूर्ण व सविस्तर माहिती ज्या यंत्रणेकडून योजना घेण्यात येणार आहे. त्या यंत्रणेच्या कार्यकारी अभियंत्याने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने संबंधित गावातील ग्रामस्थांना ग्रामसभेच्या माध्यमातून विशद

करावी. प्रादेशिक योजनेच्या बाबतीत अंशा ग्रामसभा संबंधीत गावात जिल्हा परिषदेच्या सहकार्याने घ्याव्यात.

**क)** ग्रामस्थांनी ग्रामसभेच्या माध्यमातून मान्य केलेल्या योजनेच्या उद्‌भवाचे स्थान व त्याची क्षमता, साठवण टाकीची जागा, वितरण व्यवस्था व इतर तपशीलाबाबतची माहीती गोषवा-यासह संबंधीत ग्रामपंचायतीस कार्यान्वयन यंत्रणेने द्यावी.

**ड)** ग्राम पंचायतीचा योजना स्वीकृतीचा ठराव होण्यापूर्वी वर ब) व क) येथे नमूद केलेली अनिवार्य प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती असे संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेच्या उप अभियंत्यांनी सोबतच्या **परिशिष्ट-१** मधील नमुन्यात प्रमाणित करावे तसेच सदर प्रमाणपत्र योजनेच्या अंदाज व आराखडया समवेत सादर करावे. सदर प्रमाणपत्र असल्याशिवाय सक्षम अधिका-यांनी योजनेस कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय मान्यता देऊ नये.

**इ)** ग्रामसभेची सभा झाल्यावर व क) येथे नमुद केल्या प्रमाणे, योजनेचा संपुर्ण तपशील प्राप्त झाल्यावर ग्राम पंचायतीने सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमुद केल्या प्रमाणे योजना स्वीकृतीचा, १०% लोकवर्गणी भरण्यास तयार असल्याचा व योग्य पाणी पट्टी बसवून योजनेची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची १००% खर्चाची जबाबदारी स्वीकृत करण्याबाबतचा ठराव करुन तो स्वतंत्र योजनेच्या बाबतीत कार्यान्वयन यंत्रणेला सादर करावा तर प्रादेशिक योजनेच्या बाबतीत तो जिल्हा परिषदेस सादर करावा. कार्यान्वयन यंत्रणेने सदर ठराव योजनेसमवेत सादर करावा. सदर ठराव प्राप्त झाल्याशिवाय सक्षम प्राधिका-याने योजनेस प्रशासकीय मान्यता देवू नये.

**ई)** प्रादेशिक योजनेच्या बाबतीत, योजनेत समाविष्ट गावांच्या संदर्भात वरिल ब) ते ड) मध्ये नमूद केलेली कार्यवाही पूर्ण झाल्यावर व योजनेत समाविष्ट गावांचे वरील इ) मध्ये नमूद केल्यानूसार ठराव प्राप्त झाल्यावर योजना स्वीकृतीचा व पाणीपट्टी बसवून योजनेची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकृत करण्याबाबतचा ठराव संबंधित जिल्हा परिषदेने सोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये विहीत केल्याप्रमाणे करुन तो कार्यान्वयन यंत्रणेला सादर करावा. कार्यान्वयन यंत्रणेने सदर ठराव योजनेसमवेत सादर करावा. सदर ठराव प्राप्त झाल्याशिवाय सक्षम प्राधिका-याने योजनेस प्रशासकीय मान्यता देवू नये.

**फ)** योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर कार्यान्वयन यंत्रणेने सर्व संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेस योजनेच्या सर्व उपांगाची ठळक माहिती व प्राकलने दयावीत.

**ग)** योजनेचे काम सुरु असताना संबंधित अभियंत्यांनी स्थानिक पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला योजनेची विविध अंगे समजावून सांगावीत. मंजूर योजना व तिचे प्रत्यक्षात कार्यान्वयीकरण यातील फरकामुळे पुढील तक्रारीस वाव राहू नये म्हणून योजनेचे काम चालू असताना, योजनेत येणा-या अडीअडचणी, त्या सोडविण्यासाठी करण्यात येणारी उपाययोजना, योजनेच्या मंजूर कामात त्या अनुषंगाने

करण्यात येणारे काही बदल व योजनेची प्रगती याबाबतची माहिती कार्यान्वयन यंत्रणेच्या कनिष्ठ अभियंत्यांनी दर तीन महिन्यांनी योजनेत समाविष्ट सर्व गावांच्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला दयावी.

**ह)** संबधीत गावातील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवावे.

**५) महिलांचा सहभाग :-** शुध्द पाणी सातत्याने जवळपास उपलब्ध न होण्याची सर्वात जास्त झळ महिलांना लागते. त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता आणि ख-या अर्थाने लोक सहभागाची संकल्पना साकार होण्यासाठी ग्रामीण भागामध्ये महिलांचा सर्व स्तरावरील कामात सहभाग असणे ही अत्यंत महत्वाची आणि आवश्यक बाब आहे. ग्रामीण भागातील महिला हया, या कार्यक्रमाच्या मुख्य लाभार्थी आहेत त्यामुळे योजनांचे उपलब्ध पर्यायातून सुयोग्य पर्याय निवडून उद्‌भव ठरविण्यापासून ते योजनांचे अंमलबजावणी पर्यंतच्या सर्व कामात महिलांचा सक्रीय सहभाग मिळविण्यात यावा. हा सहभाग खालील प्रकारे मिळविला येईल.

**अ)** ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर गावातील/ वाडीतील विविध सामाजिक व आर्थिक प्रवर्गातील महिलांचा समावेश करण्यात यावा.

**ब)** महिलांनी केलेल्या सुचना विचारात घेऊन योजना समाधानकारकरित्या पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित गावातील /वाडीतील महिला मंडळाकडून घेण्यात यावे.

**क)** गावे /वाडयांमधील हातपंपाच्या देखभालीकरीता महिलांना प्राधान्य देण्यात यावे.

**ड)** हातपंपाची देखभाल इतरांपेक्षा महिलांकडून जास्त चांगल्या प्रकारे होत असल्याने एनएचआरडी, ट्रायसेम आणि इतर प्रशिक्षण योजनांमध्ये प्रशिक्षण घेणा-या हातपंप मिस्त्रींपैकी किमान ३०% स्थानिक परिसरातील महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे.

**६) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी :-** वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून राज्यास मिळणा-या तरतुदी पैकी १०% तरतुद राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या तरतूदी पैकी १०% तरतुद देखभाल व दुरुस्तीकरीता राखून ती संबधीत जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात येते. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठया प्रमाणात खर्च करावा लागत असल्याने व यासाठी जास्त मोठया प्रमाणात निधीची गरज भासत असल्याने, देखभाल व दुरुस्ती करिता त्यांना अधिक निधी उपलब्ध व्हावा म्हणून या पुढे **वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून राज्यास मिळणा-या तरतुदी पैकी १५% तरतूद व राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या तरतुदी पैकी १५% तरतूद जिल्हा देखभाल व**

**दुरुस्ती निधी करीता राखून** ती संबधीत जिल्हा परिषदांना या निधीतुन हाती घ्यावयाच्या बाबी करीता वितरीत करण्यात यावी.

**७) उप अभियान:-** ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यात फ्लोराईडस्, आर्सेनिक, क्षार किंवा लोहाचे अतिप्रमाण इ. प्रश्न उद्‌भवतात अशा ठिकाणी सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता उप अभियानांतर्गत कार्यक्रम राबविले जावेत. या कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या उद्‌भवाची विश्वासार्हता वाढविण्याकरीता जलसंधारण व कृत्रिम पूर्नभरणाची कामे घेण्यात यावीत. या उप अभियानांतर्गत प्रकल्पांना मंजूरी देण्याचे अधिकार राज्यांना देण्यात आलेले आहेत. या उप अभियाना अंतर्गत राज्य व केंद्र शासनाचे निधीचे प्रमाण २५:७५ असे राहणार आहे.

**८) पाण्याची गुणवत्ता नियंत्रण व सर्वेक्षण :-** वाढते प्रदुषण व भूगर्भातील पाण्याची खालावत चाललेली पातळी यामुळे पाणी पुरवठा क्षेत्रात बिकट समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. पाण्याची गुणवत्ता नियंत्रण व सर्वेक्षणाबाबत देशात संस्थास्तरावर बरेच कार्य करण्याची गरज आहे. पाण्याच्या गुणवत्ते बाबतच्या प्रयोगशाळांची निर्मिती हा या कार्यक्रमाचा फक्त एक भाग आहे. त्याकरिता राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व गाव पातळीवर या तीन स्तरावर कार्य करुन याची अंमलबजावणी करण्यात यावी. प्राथमिक स्तरावरील पाण्याची तपासणी, इत्यादी कामे गाव पातळीवरील शैक्षणिक संस्थामधून करण्यात यावेत. त्यापुढील किचकट तपासणी करावयाची असल्यास नमुने जिल्हा प्रयोगशाळांकडे पाठविण्यात यावेत. राज्यस्तरीय प्रयोगशाळांकडे त्यापेक्षाही अधिक किचकट प्रश्न सोपवावेत. या कार्यक्रमामध्ये अंतर्भूत करावयाच्या राज्यस्तरावरील सुकाणू संस्थांना वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत १००% अनुदान देय होईल.

**९) हैड्रॉलिक रीग्ज व हैड्रो फ्रॅक्चरिंग संयंत्रे :-** विंधण विहिरी/ कूपनलिका यांचेकरिता आवश्यक रिंग्ज व हैड्रो फ्रॅक्चरिंग संयंत्रे यांच्या खरेदीकरीता केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५०% खर्च करण्यात येईल. किमान गरजा कार्यक्रमाखाली राज्य शासनास आधुनिक रीग्जची खरेदी करावयाचे झाल्यास त्याला अनुसरुन वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली केंद्र शासनाकडून समप्रामणात अनुदान मिळेल.

**१०)मानव संसाधन विकास कार्यक्रम:-** राष्ट्रीय मानव संसाधन विकास कार्यक्रमांतर्गत गावस्तरावरील कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल व दुरुस्तीकरीता स्थानिक संस्थामध्ये प्रशिक्षित कर्मचा-यांचे जाळे निर्माण करणे, महिलांना प्रशिक्षण देणे ही उद्दिष्टे आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्याकरिता आवश्यक कर्मचा-यांना राज्यस्तरावरील संस्थाकडून प्रशिक्षित करण्यात यावे. या कार्यक्रमाखाली राज्यस्तरावर मानव संसाधन विकास यंत्रणा निर्माण करण्यात यावी. या कार्यक्रमाकरीता राज्याला केंद्र शासनाकडून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत १००% अनुदान देय होईल.

**११) माहिती शिक्षण व प्रसार कार्यक्रम (IEC):-** लोकांमध्ये स्वच्छ व शुध्द पाण्याची वाढती मागणी निर्माण व्हावी व स्वच्छतेबाबत लोकांच्या मानात जागृती निर्माण व्हावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शुध्द पाण्याची गरज व त्याचे महत्व लोकांना विविध प्रसार माध्यमांद्वारे पटवून देण्यात यावे. याकरिता केंद्र शासनाकडून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत १००% अनुदान देय होईल.

**१२) संनियंत्रण आणि मूल्यमापनः-** पाणी पुरवठा कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन योग्यप्रकारे केले जाते किंवा नाही याबाबतचा अभ्यास केंद्र शासनाकडून विविध संस्था/ संघटना यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येतो. त्यानुसार राज्य शासनाने राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांचा मुल्यमापन अभ्यास केंद्र शासनाच्या मंजुरीने केल्यास त्याकरीता लागणा-या खर्चाकरीता १००% टक्के अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून देय होईल.

**१३) माहिती तंत्रज्ञानाद्वारे व्यवस्थापन(MIS):-** विविध योजनांचे परिणामकारक संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश राहील.

**अ)** स्थानिक पातळीवर पाणी पुरवठयाचे नियोजन आणि संनियंत्रण .

**ब)** माहिती संकलित करणे, तिचे विश्लेषण करणे आणि वेगवेगळया स्तरावर देवाणघेवाण इत्यादीचे संगणकीकरण.

**क)** याकरिता प्रशिक्षणासाठी सहाय्य.

माहिती तंत्रज्ञानाद्वारे व्यवस्थापन लागू करण्याकरिता केंद्राकडून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत १००% अनुदान देय होईल.

**१४) ग्रामीण भागातील शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधाः-** नवव्या पंचवार्षिक योजने अखेर पर्यंत ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देता आली पाहिजे. म्हणून पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत अशी सुविधा नसलेल्या सर्व शाळांचा समावेश करावा. याकरिता येणारा खर्च वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत ५०% केंद्र शासनाकडून मिळेल तर उर्वरीत ५०% खर्च राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत तरतूदी मधून करावा.

२. हे आदेश नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६६५/व्यय-३, दि.२४ जुलै, २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(व्ही. पी. राजा)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व)यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव (प्रशासन)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
संचालक, भूजल सर्वेक्षणे आणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने,
निवडनस्ती, पापु०७

## परिशिष्ट-१

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते कि, जिल्हा परिषद /महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग यांनी गांव तालुका जिल्हा यांच्यासाठी तयार केलेल्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेची प्राकलने व आराखडे अंतिम करण्यापूर्वी सदर ग्रामपंचायतीच्या दिनांक रोजी वाजता झालेल्या ग्राम सभेत त्या गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या योजनेसाठी असलेले विविध पर्याय, त्या सर्व पर्यायी योजनांचा अंदाजीत भांडवली खर्च, देखभाल दुरुस्ती वरील वार्षिक खर्च व संभाव्य पाणीपट्टी या बाबतची संपूर्ण व सविस्तर माहिती लोकांना समजावून सांगण्यात आली असून त्या संदर्भात स्थानिक जनतेने विचारलेल्या प्रश्नांना यथोचित उत्तरे देऊन त्यांचे समाधान करण्यात आले आहे. व ग्रामस्थांनी निवडलेल्या योजनेची प्राकलने व आराखडे सदर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सहमतीने अंतिम करण्यात आली आहेत.

२. योजना मान्य असल्याबाबतचा सर्वसाधारण ग्रामसभेच्या निर्णयाबाबत ग्रामपंचायतीच्या दिनांक च्या सभेत चर्चा करण्यात आली असून ग्रामपंचायतीने सदर योजना स्वीकृतीविषयी ठराव करण्यापूर्वी योजनेच्या उद्‌भवाचे स्थान व त्याची क्षमता, साठवण टाकीची जागा, वितरण व्यवस्था, संभाव्य पाणी पट्टी व इतर तपशीलाची माहिती सदर ग्रामपंचायतीला देण्यात आली आहे.

**(उप अभियंता)**
**पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद/**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उप विभाग**

## परिशिष्ट-२

### एका गावाच्या स्वतंत्र नळ योजनेसंबंधी ग्रामपंचायतीने मंजूर करावयाच्या ठरावाचा नमुना

ग्रामपंचायतीची सर्वसाधारण मासिक सभा, मा. सरपंच, ग्रामपंचायत----------------- यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक------------- रोजी ------------ वाजता खालील विषयावार विचार करण्यासाठी भरली, सभेला खालील सभासद उपस्थित होते :-

१)

२)

३)

४)

विषय क्रमांक :- ----------- नळ पाणी पुरवठा योजनेसंबंधी शासनाच्या मंजूरीबाबत विचार करणे.

ठराव क्रमाक :- ---------------

१) जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग-----------यांनी ---------- गावांसाठी तयार केलेली नळ पाणी पुरवठा योजना जिची किंमत रुपये----------/- निव्वळ व रु. -------- /- ढोबळ आहे, ती ग्रामपंचायत------- मान्य करण्यास तयार आहे, तसेच योजनेच्या भांडवली खर्चापैकी १० % रक्कम लोकवर्गणीव्दारे भरण्यास व योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापना करीता करावा लागणारा १०० % खर्च सोसावयास ग्राम पंचायत तयार आहे.

२) प्रस्तुत योजना पूर्ण झाल्यानंतर व यशस्वी चाचणी दिल्यानंतर शासनाच्या आदेशाप्रमाणे ती एक महिन्यांच्या आत हस्तांतरीत करुन घेऊन राबविण्यास ग्रामपंचायत, ----------- तयार आहे.

३) योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत----------आवश्यक ती पाणी पट्टी बसविण्यास व आवश्यक असल्यास, पाणी पट्टीच्या दरात वाढ करण्यास तयार आहे.

४) योजना राबवितांना अस्थायी आस्थापना खर्चाच्या तसेच, घसारा, मशिनरी दुरुस्ती वगैरे खर्चासाठी ग्रामपंचायत, --------- शासनाकडून किंवा जिल्हा परिषदेकडून अनुदानाची मागणी करणार नाही. ग्रामपंचायत,------------हा खर्च योग्य अशी पाणीपट्टी व कर बसवून भागविण्यास तयार आहे.

५) ग्रामपंचायत --------- ने वरिल बाबींचे अनुकरण न करता योजना ताब्यात घेण्याची व राबविण्याची जबाबदारी टाळल्यास सदर योजनेच्या देखभाल , दुरुस्ती व व्यवस्थापना करीता जिल्हा परिषदेस झालेला खर्च ग्रामपंचायत, ---------ला शासनाकडून/जिल्हापरिषदेकडून मिळणा-या पैशांतून

किंवा अनुदानातून शासनाने/जिल्हा परिदषेने परस्पर वळता करून घेण्यास ग्रामपंचायत -----------

मान्यता देत आहे.

सूचक -श्री.

अनुमोदक -श्री.

ठराव क्रमांक---------------------------सर्वानुमते पास करण्यात आला.

**ग्राम विकास अधिकारी /ग्रामसेवक** **सरपंच, ग्रामपंचायत**

## परिशिष्ट -३

**प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेसंबधी संबंधित जिल्हा परिषदेने मंजूर करावयाच्या ठरावाचा नमूना**

जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा, मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, -------यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद कार्यालयात दि.--------------रोजी-----वाजता खालील विषयावर विचार करण्यासाठी भरली.

विषय क्रमांकः- प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेसंबधी शासनाच्या मंजूरीबाबत विचार करणे.

ठराव क्रमांकः-----------------

१) जिल्हा परिषद ------------ने /अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण --------- ने-------
---गावासाठी तयार केलेली प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना जिची किंमत रुपये---------निव्वळ व रु.------/- ढोबळ आहे, ती जिल्हापरिषद -------मान्य करण्यास तयार आहे. तसेच योजनेच्या भांडवली खर्चापैकी १०% रक्कम लोकवर्गणी द्वारे भरण्यास व योजनेच्या देखभाल ,दुरुस्ती व व्यवस्थापना करीता करावा लागणारा १००% खर्च सोसावयास जिल्हा परिषद तयार आहे.

२) प्रस्तुत योजना पूर्ण झाल्यानंतर व यशस्वी चाचणी दिल्यानंतर शासनाच्या आदेशाप्रमाणे ती एक महिन्यांच्या आत हस्तांतरीत करुन घेऊन राबविण्यात जिल्हापरिषद,---------तयार आहे.

३) योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने जिल्हापरिषद---------------आवश्यक ती पाणी पट्टी बसविण्यास व आवश्यक असल्यास, पाणी पट्टीच्या दरात वाढ करण्यास तयार आहे.

४) योजना राबवितांना अस्थायी आस्थापना खर्चासाठी तसेच घसारा, मशिनरी दुरुस्ती वगैरे खर्चासाठी शासनाकडून अनुदानाची मागणी करणार नाही. जिल्हापरिषद ------------ योजनेच्या देखभाल - दुरुस्तीवरील खर्च योग्य अशी पाणी पट्टी व कर बसवून भागविण्यास तयार आहे.

५) जिल्हा परिषद,------ने वरील बाबीचे अनुकरण न करता योजना ताब्यात घेण्याची व राबविण्याची जबाबदारी टाळल्यास सदर योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी झालेला खर्च शासनाकडून मिळणा-या पैशांतून किंवा अनुदानातून शासनाने परस्पर वळता करुन घेण्यास जिल्हा परिषद---------मान्यता देत आहे.

६) जिल्हा परिषद ------------मान्यता देत आहे.

सूचक श्री.
अनुमोक श्री.
ठराव क्रमांक --------------------- सर्वानुमते पास करण्यात आला.

**अध्यक्ष, जिल्हापरिषद.**

----------------

सांकेतांक क्रमांक २००८०५१४१५५६५१००१

महानगरपालिका(बृहन्मुंबई वगळून), व "अ" वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयाची शीघ्र लेखा तपासणी (Rapid Performance Audit) करण्यासाठी कार्यगटाचे गठण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रं. ग्रापापु १०००/ प्रक्र १०१ /पापु०७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑगस्ट,२०००

प्रस्तावना:-

राज्यातील बहुतांश महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये कार्यान्वित असलेल्या पाणी पुरवठा योजनांची प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती होत नाही, या योजनांमध्ये हिशोब बाह्य पाण्याच्या वापराचे प्रमाण फार जास्त आहे. पाण्याची गळती,चोरी,अवैध वापर, अनधिकृत नळ जोडण्या इ.मुळे अस्तित्वातील योजनेमधून स्थानिक जनतेस पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. पाणी पुरवठा योजनेची यांत्रिक प्रणाली व उपांगे ज्या शास्त्रीय वापरासाठी व उद्देशासाठी बसविली आहेत त्याप्रमाणे त्याचा वापर व उपयोग न होता, उलट अयोग्य वापरामुळे पाणी पुरवठा व पाणी शुध्दतेवर विपरीत परीणाम होत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे. ब-याचदा अस्तित्वातील योजना चालविण्याची प्रचलित व्यवस्था आणि कार्यान्वयनाच्या विहित पध्दतीकडे दुर्लक्ष केले जाते.योजनेमधील विविध मिटर्स आणि परिमाण हे देखभाल न केल्यामुळे अकार्यरत आहेत.योजनेच्या स्त्रोतापासून ते वितरण व्यवस्थे पर्यंत असलेल्या त्रूटींचे योग्य मुल्यमापन होत नसल्याने,अस्तित्वातील योजनेमध्ये वाव असुनही सुधारणा होत नसल्याचे आढळून आले आहे. अशा परिस्थितीत देखभाल व दुरुस्तीवर भर देऊन पाण्याची संख्यात्मक व गुणात्मक गरज भागविण्याऐवजी नागरी संस्थांकडून वाढीव पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येतात.

२. नागरी पाणी पुरवठा योजना मधील वर उल्लेख केलेल्या त्रूटी दूर करण्यासाठी या योजनांच्या कार्यान्वयनाची शीघ्र लेखातपासणी (RAPID PERFORMANCE AUDIT) करून योग्य उपाय योजना सूचविण्यासाठी "कार्यगट"स्थापन करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून शासनास प्राप्त झाला आहे. सदस्य सचिव (तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनाची शीघ्र लेखातपासणी करण्यासाठी कार्यगटाचे गठण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन महानगरपालिका (बृहन्मुबई वगळून) व 'अ' वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनाची शीघ्रलेखा तपासणी (Rapid Performance Audit ) करुन त्या मध्ये आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविण्याकरीता प्रत्येक जिल्हया मध्ये खालील प्रमाणे "कार्यगट" गठीत करण्यास शासन मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बी. व्ही. रोटकर, माजी सदस्य-सचिव म.पा.पु.व ज.नि.मंडळ | अध्यक्ष |
| २) | इंडीयन वॉटर वर्क्स संस्थेचा स्थानिक प्रतिनिधी (म.जी.प्रा. किंवा संबंधित स्थानिक संस्थेशी संबंधित नसलेला) | सदस्य |
| ३) | पाणी पुरवठा योजनांचा अनुभव व पाणी पुरवठा अभियांत्रिकी विषयाशी निगडीत असणारा नजिकच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रध्यापक.(प्राधान्याने शासकीय महाविद्यालयातील) | सदस्य |
| ४) | जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी | सदस्य-सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

१) पाणी पुरवठा योजनांच्या विविध उपांगांचे कार्यान्वयन व देखभाल योग्यपध्दतीने होत आहे, व त्यांचा गुणात्मक व संख्यात्मक उद्देश साध्य होत आहे हे पाहणे.

२) योजनांच्या स्त्रोतापासून ते वाटप व्यवस्थेपर्यंत बसविलेल्या विविध उपांगाच्या सद्यःस्थितीचे कार्यकृति व एकात्मिक संरचनेच्या अनुषंगाने मूल्यमापन करणे.

३) आराखडा, कार्यान्वयन पध्दती, अपर्याप्त नियमित/प्रतिबंधात्मक देखभाल, वीजपुरवठा, कर्मचारी वृंद व देखभाल दुरुस्तीसाठी निधी व संपूर्ण व्यवस्थेची उपांगे सदोष असण्या-या कारणांचा शोध घेणे .

४) देखभाल दुरुस्ती योग्य पध्दती व त्या मधील प्रयोगशाळेतील नियमीत कार्य, आवश्यक मीटर्स, लेखा ठेवणे व योजनेची देखरेख इत्यादी बाबी अवलंबण्यासाठी शिफारस करणे.

५) ढोबळ अंदाजासह योजनेच्या विविध उपांगाच्या आवश्यक दुरुस्त्या करण्यासाठी तात्काळ कृति योजना तयार करणे.

६)कार्यान्वयन कर्मचारी व पर्यवेक्षक अधिकारी यांची संख्या,अर्हता आणि अनुभव यांच्या अनुषंगाने सद्य स्थितीची तपासणी करणे.

७) कार्यान्वयन कर्मचारी व पर्यवेक्षय अधिकारी यांच्या प्रशिक्षण आवश्यकते संबंधी शिफारशी करणे.

८) पाण्यातील प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय योजना करण्याकरिता सूचना करणे.

कालावधी:

या कृतीगटाने राज्यातील सर्व महानगर पालिकेत ( बृहन्मुंबई वगळून ) व सर्व अ वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांच्या "कार्यन्वयनाची" शीघ्र लेखा तपासणी "Rapid Performace Audit"त्वरीत पूर्ण करावी.

मानधन इ.

या कार्यगटाचे अध्यक्षांना प्रत्येक योजनेच्या भेटीस रु.१०००/- (रुपये एक हजार फक्त) या प्रमाणे मानधन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या सदस्य सचिव (तांत्रिक), दर्जाच्या अधिका-यास लागू असलेल्या दराने प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

२. कार्यगटाच्या संरचनेनुसार अ.क्र. २ व ३ येथे नमूद संबंधीत जिल्हयातील संबंधित क्षेत्रातील अधिका-यांची समितीवर सदस्य म्हणून नियुक्ति करण्यासाठी संबंधित जिल्हा पाणी पुरवठा अधिका-याने निवड करावी व त्यास कार्यगटाच्या अध्यक्षांची मान्यता घ्यावी.

३. कार्यगटाच्या कामकाजा करिता, आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ व इतर सहाय्य संबधित जिल्हा पाणी पुरवठा अधिका-यांनी कार्यगटाच्या अध्यक्षांना तात्काळ उपलब्ध करुन दयावे.

४. कार्यगटाचे अध्यक्षांना देण्यात येणा-या मानधनावरील खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सोसावा. व तो त्यांना तात्काळ अदा करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सुधीर ठाकरे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
संचालक,नगरपालिका प्रशासन,मुंबई.
श्री.बी.व्ही. रोटकर, माजी सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंड
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी
सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे.
सर्व उप संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
निवडनस्ती पापु०७.

संगणक सांकेतांक २००८०९२२१५३२५३००१

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत "स्वतंत्र गावांच्या रुपये ७५ लाखा" पर्यंतच्या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील "विभाग" जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे व त्यासाठी जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००० /प्र.क्र.१०७/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ७/११/२०००**

**वाचा :-** शासन अधिसुचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक : पंराज-१०००/प्र.क्र.२५३/०६, दिनांक २४/१०/२०००

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या पहिल्या अनुसूचीतील "सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी" शिर्षाखलील नोंद क्रमांक ५८ ते ६१ समोरील नोंदीनुसार "रु. १५ लाख पर्यंतच्या" ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या योजनांच्या बांधकामाची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आलेली होती. संदर्भीय अध्यादेशांन्वये **"स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाख पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व सर्व ग्रामिण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली आहेत. त्या रकमेपर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी करणे जिल्हा परिषदांना शक्य व्हावे यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या १९ जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यरत आहेत त्यामुळे उर्वरित १४ (सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, सांगली, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, वाशिम, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली) जिल्हा परिषदांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यान्वित करण्यासाठी १४ विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्याची व त्यासाठी जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर आवश्यक पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, संदर्भीय अधिसूचनेन्वये **"स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाख पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व संपूर्ण ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे देखभाल दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अतिरिक्त ठरलेली सोबतच्या **परिशिष्ट -१** मध्ये दर्शविलेली एकुण ४६२ पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन रद्द करण्यात येत आहेत.

२. जिल्हा परिषदाअंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा आकृतीबंध व महाराष्ट्र जीवन प्रधिकरणा कडून जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत होणा-या विभागाचा आकृतीबंध समान राहावा यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हस्तांतरीत होणा-या विभागातील खाली दर्शविल्या प्रमाणे पदे प्रत्यार्पित करणे, नव्याने पदे निर्माण करणे, पदांचे पदनाम बदलणे व पदांचे उन्नतीकरण करणे यास शासन मंजुरी देत आहे.

अ) म.जी.प्रा. कडील विभागातील मंजूर पदां मधून खालील पदे प्रत्यार्पित करण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | म.जी.प्रा.च्या एका विभागासाठी मंजूर पदे | प्रत्याप्रित करावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १. | उप अभियंता(यांत्रिकी) | ८०००-१३५०० | ०१ | १४ |
| २. | कनिष्ठ अभियंता(यांत्रिकी) | ५५००-९००० | ०१ | १४ |
| ३. | भांडारपाल | ४५००-७००० | ०१ | १४ |
| ३. | दप्तरी | २६१०-४००० | ०१ | १४ |